# चंद्रकांत पाटील यांची विद्यापीठास भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी शिवाजी विद्यापीठ व न्यू कॉलेजला नॅकचे मानांकन मिळाल्याबद्दल सदिच्छा भेट दिली व वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यापीठास नॅकचे ३.५२ 'सीजीपीए' गुणांकनासह मानांकन प्राप्त झाले आहे. विद्यापीठाच्या या उल्लेखनीय मानांकनाबद्दल आमदार पाटील यांनी विद्यापीठामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची भेट घेऊन अभिनंदन केले. या मानांकनामुळे विद्यापीठाची जबाबदारी वाढली असून, पुढील मानांकन प्राप्त होण्यासाठी, तसेच विद्यापीठाचा नावलौकिक वाढवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असणाऱ्या कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व त्यांच्या सहकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष राहुल चिकोडे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत, प्रा. एन. बी. गायकवाड, प्रा. एम. एस. देशमुख, आदी उपस्थित होते.

न्यू कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या व कॉलेजचे कौतुक केले.



**शिवाजी विद्यापीठास नॅकचे मानांकन मिळाल्याबद्दल भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठास भेट देऊन वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

## पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक

शिवाजी विद्यापीठामध्ये नो व्हेईकल डे असल्यामुळे आमदार पाटील यांनी विद्यापीठाच्या गेट पासून ते मुख्य इमारती पर्यंतचा प्रवास विद्यापीठाच्या बॅटरीवर चालणाऱ्या गाडीतून प्रवास केला. पर्यावरणपूरक या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

0 4 APR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठासह न्यू कॉलेजचे चंद्रकांत पाटील यांच्याकडून अभिनंदन

## विद्यापीठाला 'ए प्लस प्लस' : न्यू कॉलेजला 'ए प्लस' मानांकन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठास नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन व न्यू कॉलेजला 'ए प्लस' मानांकन प्राप्त झाले आहे. त्याबद्दल भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी सदीच्छा भेट घेतली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले. तसेच विविध शैक्षणिक विषयांवर सविस्तर चर्चा करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शिवाजी विद्यापीठास नॅकचे ३.५२ 'सीजीपीए' 'ए प्लस प्लस' मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामुळे विद्यापीठाची आणखीनच जबाबदारी वाढली असून, पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असेही ते म्हणाले. महिन्याच्या पहिल्या शनिवारी विद्यापीठात 'नो व्हेइकल डे' असल्यामुळे पाटील यांनी गेट पासून ते मुख्य इमारती पर्यंतचा प्रवास बॅटरीवर चालणाऱ्या गाडीतून केला. या पर्यावरणपूरक उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सारथ्य केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळाल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील. सोबत डॉ. एन. बी. गायकवाड, राहुल चिकोडे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत.**

### न्यू कॉलेजला सदिच्छा भेट

विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये न्यू कॉलेजने ३.३२ सीजीपीएसह नॅकचे 'ए प्लस' मानांकन प्राप्त केले आहे. त्यानिमित चंद्रकांतदादा पाटील यांनी कॉलेजला सदिच्छा भेट दिली. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य डॉ. पाटील, उपप्राचार्य डॉ. एम. शेख, नॅक को-ऑर्डिनेटर डॉ. एन. व्ही पवार, आर. डी. ढमकले उपस्थित होते.

# विद्यापीठास आ. चंद्रकांत पाटील यांची भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रकांत पाटील यांनी शिवाजी विद्यापीठास नॅकचे 'अ प्लस प्लस' मानांकन आणि न्यू कॉलेजला 'अ' प्लस मानांकन प्राप्त झाल्याबद्दल सदिच्छा भेट दिली. आ. चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठाला मिळालेल्या मानांकनाबाबत व विविध शैक्षणिक विषयांवर कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

भाजपा जिल्हाध्यक्ष राहुल चिकोडे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रजिस्टार डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत, प्रा. एन. बी. गायकवाड, प्रा. एम. एस. देशमुख आदी उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये सर्वोच्च मानांकन असणारे नॅकचे अ प्लस हे मानांकन न्यू कॉलेजला प्राप्त झाले. यानिमित्त भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. पाटील यांनी न्यू कॉलेजला सदिच्छा भेट दिली. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य डॉ. शेख, नॅक को-ऑर्डिनेटर डॉ. एन. व्ही. पवार, आर. डी. धमकले आदी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठामध्ये नो व्हेईकल डे असल्यामुळे भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठाच्या गेटपासून ते मुख्य इमारतीपर्यंतचा प्रवास विद्यापीठाच्या बॅटरीवर चालणाऱ्या गाडीतून केला.



डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचे अभिनंदन केले. यावेळी आमदार ऋतुराज पाटील, संजय जाधव, डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाची कामगिरी अभिमानास्पद

## डॉ. संजय पाटील : कुलगुरूंचे केले अभिनंदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कसबा बावडा :** शिवाजी विद्यापीठाने आपल्या सांघिक कामगिरीच्या जोरावर 'नॅक'चे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळवले आहे. अभ्यासक्रम, शिक्षण, संशोधन, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांत विद्यापीठाने गरुडझेप घेतली असून, ही कामगिरी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती व शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी सांगितले.

डॉ. संजय डी. पाटील व आमदार ऋतुराज पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची भेट घेत विद्यापीठाने 'नॅक' मानांकनात घेतलेल्या गरुडभरारीबद्दल अभिनंदन केले. यावेळी विद्यापीठाची भविष्यकालीन योजना, प्रगती यावर सविस्तर चर्चा झाली. विद्यापीठाच्या भविष्यकालीन विस्तार व अन्य बाबींसाठी शासन पातळीवरून आवश्यक असलेला निधी व अन्य मदतीसाठी आपला नेहमीच पुढाकार राहील, अशी ग्वाही आमदार ऋतुराज पाटील यांनी दिली.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नंदिवडेकर, डॉ. आर. के. कामत, संजय जाधव उपस्थित होते.

0 4 APR 2021
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची कामगिरी अभिमानास्पद

## – डॉ. संजय डी. पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने आपल्या सांघिक कामगिरीच्या जोरावर 'नॅक'चे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळवले आहे. अभ्यासक्रम, शिक्षण, संशोधन, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रात विद्यापीठाने गरूडझेप घेतली असून, ही कामगिरी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती व शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांनी सांगितले.



कोल्हापूरः शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे स्वागत करताना डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील. सोबत आ. ऋतुराज पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य संजय जाधव, प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, आयक्यूएसी सेलचे प्रमुख डॉ. आर. के. कामत आदी.

डॉ. संजय पाटील व आमदार ऋतुराज पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची नुकतीच भेट घेतली. विद्यापीठाची भविष्यकालीन योजना, प्रगती यावर सविस्तर चर्चा झाली.

शिवाजी विद्यापीठाने 'नॅक'चे सर्वोच्च मानांकन मिळवून शिक्षण क्षेत्रात नवा बेंचमार्क निर्माण केला आहे. विद्यापीठाशी संबंधित सर्वच घटकांनी घेतलेल्या परिश्रमांची ही पोहोचपावती आहे. संशोधन कार्यात विद्यापीठचे नाव यापूर्वीच आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहे. भविष्यात प्रगतीच्या सर्वच क्षेत्रात विद्यापीठाचा झेंडा डौलाने फडकताना दिसेल, असा विश्वास डॉ. पाटील यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाने मिळवलेले यश हे शैक्षणिक क्षेत्रात कोल्हापूरची मान अधिक उंचावणारे आहे. विद्यापीठाच्या भविष्यकालीन विस्तार व अन्य बाबींसाठी शासन पातळीवरून आवश्यक असलेला निधी व अन्य मदतीसाठी आपला नेहमीच पुढाकार राहील, अशी ग्वाही आमदार ऋतुराज पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आयक्यूएसी सेलचे प्रमुख डॉ. आर. के. कामत, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव उपस्थित होते.

# कौलगेच्या सौरभ पाटीलला राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर

## महेश्वरी गोळेला कुलपती पदक : मंगळवारी ऑनलाईन दीक्षांत समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोनारोच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून शिवाजी विद्यापीठाचा यंदाचा ५७ वा दीक्षांत सोहळा ऑनलाईन होणार आहे. मंगळवारी (दि. ६) सकाळी ११ वाजता शाहू सिनेट सभागृहातून शिववार्ता यु ट्यूब चॅनेलवरून थेट प्रसारण होणार आहे.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारती तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे मार्गदर्शन करणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत हे देखील ऑनलाईनच सहभाग घेणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी ऑनलाईन पत्रकार बैठकीत ही माहिती दिली. यावेळी पदार्थ विज्ञान विभागातील दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी सौरभ पाटील याची राष्ट्रपती सुवर्णपदकासाठी, तर सातारा येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाची विद्यार्थिनी महेश्वरी गोळे हिची कुलपती पदकासाठी निवड घोषित केली. यावेळी प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, लेखाधिकारी व्ही.टी. पाटील उपस्थित होते.






- ३५,५९७ विज्ञान व तंत्रज्ञान शाखा
- २१,९२७ वाणिज्य व व्यवस्थापन शाखा
- १७,८८३ मानव्यविद्या शाखा

- ४५,३०७ महाविद्यालयातून पदवी घेणारे
- ३०,२५१ पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र घेणारे
- १,९८४ प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणारे

### सौरभ पाटील

राष्ट्रपती सुवर्ण पदकाचा मानकरी ठरलेला सौरभ संजय पाटील हा कौलगे (ता. कागल) येथील आहे. तो शिवाजी विद्यापीठात एमएसीच्या दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी आहे. मागील वर्षातील क्रीडा, बौध्दिक, कला क्षेत्रासह एनसीसी, एनएसएस याच्या जोरावर या पदकासाठी निवड झाली आहे.



### महेश्वरी गोळे

कुलपती सुवर्णपदकाची मानकरी ठरलेली महेश्वरी धनंजय गोळे ही सोमवार पेठ, सातारा येथील आहे. छत्रपती शिवाजी महाविद्यालयात एम.ए.मध्ये सर्व विषयांत प्रथम येण्याची कामगिरी तिने केली आहे. संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल तिला या पदकाने सन्मानित करण्यात येत आहे.



# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ मंगळवारी

- सौरभ पाटील राष्ट्रपती सुवर्ण पदकाचा मानकरी
- महेश्वरी गोळेला कुलपती सुवर्णपदक



सौरभ पाटील



महेश्वरी गोळे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ ६ एप्रिल रोजी ऑनलाईन होणार आहे. विद्यापीठाच्या इतिहासात यावर्षी पहिल्यांदाच सुमारे ७७ हजार ५४२ पदवी प्रमाणपत्रांचे वाटप केले जाणार आहे. पदार्थविज्ञान विभागातील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी सौरभ संजय पाटील यास राष्ट्रपती सुवर्ण पदक व कुलपती सुवर्णपदक साताऱच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी महेश्वरी धनंजय गोळे हिला जाहीर झाले आहे. ही माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी ऑनलाईन पत्रकार परिषदेत दिली.

राजर्षी शाहू सिनेट सभागृहात मंगळवारी सकाळी १०.४५ वाजता दीक्षांत समारंभ होणार आहे. समारंभासाठी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे प्रमुख पाहुणे आहेत. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत विशेष अतिथी असतील.

पदवी प्रमाणपत्र घेणारे एकूण विद्यार्थी ७७ हजार ५४२ आहे. पीएच.डी. १७४, **पान ६ वर ▸**

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ मंगळवारी

एम.फिल. ३६, पदव्युतर पदवी १०,३४२, पदवी ६६,३७३, डिप्लोमा ५५३, सर्टिफिकेट ६४ विद्यार्थी आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखा ३५ हजार ५९७, वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखा २१ हजार ९२७, मानव्यविद्या शाखा १७ हजार ८८३ व आंतरविद्या शाखेच्या २१३५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यू ट्यूब चॅनलवरून दीक्षांत समारंभाचे थेट प्रसारण करण्यात येणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

04 APR 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सौरभ पाटील सुवर्णपदकाचा मानकरी

## सातारच्या महेश्वरीला कुलपती पदक : शिवाजी विद्यापीठाचा ऑनलाईन दीक्षांत समारंभ मंगळवारी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ ६ एप्रिल रोजी ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील व्दितीय वर्षाचा विद्यार्थी सौरभ पाटीलला राष्ट्रपती सुवर्ण पदक व कुलपती मेडल सातारच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी महेश्वरी गोळे हिला जाहीर झाले आहे. यंदा पहिल्यांदाच सुमारे ७७ हजार ५४२ विद्यार्थी पदवी प्रमाणपत्र घेणार आहेत, अशी माहिती ऑनलाईन पत्रकार परिषदेत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.



विज्ञान व तंत्रज्ञान शाखा– ३५ हजार ५९७, वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखा– २१ हजार ९२७, मानव्यविद्या शाखा– १७ हजार ८८३ तर आंतरविद्या शाखा– २१३५ हजार, असे एकूण ७७ हजार ५४२ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र पोस्टाने वितरित केली जाणार आहेत.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात सकाळी ११ वाजता ऑनलाईन पद्धतीने दीक्षांत समारंभ होणार आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सर्व स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे व पारितोषिके स्नातकांना पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार आहेत. ऑनलाईन दीक्षांत समारंभात सहभागी होण्यासाठी यू-टुयबच्या लिंक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे, तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले आहे. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित होते.



### संशोधनात करिअर करणार

केंद्र सरकारची ४ लाखाची इन्स्पायर शिष्यवृत्ती संशोधनासाठी मला मिळाली आहे. या शिष्यवृत्तीतून अपंग, मतीमंद संस्थेतील दिपक वडर या मुलाला शिक्षणासाठी दत्तक घेतले आहे. आतापर्यंत राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय पातळीवर ८ संशोधन पेपर प्रसिध्द झाले आहेत. पंतप्रधानांशी चर्चा करण्यासाठी माझी निवड झाली होती. माझ्या यशासाठी भौतिकशास्त्रचे सर्व शिक्षक, आई-वडील, कुटुंबियांचे मार्गदर्शन लाभले. भविष्यात संशोधन क्षेत्रात करिअर करणार आहे.

– **सौरभ पाटील**, पदार्थविज्ञान विभाग, शिवाजी विद्यापीठ



### क्लासवन अधिकारी बनणार

मला कुलपती पदक मिळण्यासाठी पोर्णिमा मोठे यांचे मार्गदर्शन लाभले. माझे आई, वडील, व कुटुंबियांचे सहकार्य लाभले. हे पदक मिळाल्याचा हा आनंद शब्दात व्यक्त करता येत नाही. सध्या मी कोरीवळे (ता. कराड) येथे पोस्ट ऑफीसमध्ये ब्रँच पोस्ट मास्तर म्हणून कार्यरत आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू असून भविष्यात क्लासवन अधिकारी बनण्याचे स्वप्न आहे.

– **माहेश्वरी गोळे**, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा

# शिवाजी विद्यापीठाचा मंगळवारी दीक्षांत सोहळा

## ऑनलाईन पद्धतीने सोहळा : सौरभ पाटील राष्ट्रपती पदक, महेश्वरी गोळे कुलपती पदकाची मानकरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ मंगळवार, दि. ६ एप्रिल रोजी ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. विद्यापीठ इतिहासात प्रथमच ७७ हजार ५४२ जणांना पदवी प्रमाणपत्रांचे वाटप होणार आहे. विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान विभागाच्या द्वितीय वर्षाचा विद्यार्थी सौरभ पाटील याला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी महेश्वरी गोळे हिला



सौरभ पाटील महेश्वरी गोळे

कुलपती पदक जाहीर झाले आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू म्हणाले, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहात मंगळवारी सकाळी ११ वाजता ऑनलाईन पद्धतीने दीक्षांत समारंभ होणार आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत, तर प्रमुख उपस्थिती अ. भा. तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची असणार आहे.

या सोहळ्यात विज्ञान-तंत्रज्ञान शाखेतील ३५ हजार ५९७, वाणिज्य-व्यवस्थापन शाखेतील २१ हजार ९२७, मानव्यविद्या शाखा १७ हजार ८८३, तर आंतरविद्या शाखेतील २ हजार १३५ विद्यार्थ्यांना पोस्टाने पदवी प्रमाणपत्र पाठवले जाणार आहे. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यूट्यूब चॅनलवरून त्याचे थेट प्रसारण करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभागी व्हावे.'

पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, जी. आर. पळसे, व्ही. टी. पाटील, अलोक जत्राटकर उपस्थित होते.

# कौलगेच्या सौरभ पाटीलला राष्ट्रपती सुवर्ण पदक

## कुलगुरू शिर्के; दीक्षान्त समारंभ मंगळवारी, इतिहासात प्रथमच ऑनलाईन पद्धतीने

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षान्त समारंभ मंगळवारी (ता. ६) ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. यामध्ये राष्ट्रपती सुवर्ण पदक सौरभ संजय पाटील, तर कुलपती सुवर्ण पदक महेश्वरी धनंजय गोळे यांना जाहीर करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी याची घोषणा आज पत्रकार परिषदेत केली. सौरभ मूळचे कौलगे (ता. कागल), तर महेश्वरी सातारा येथील आहेत.

डॉ. शिर्के म्हणाले, "विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच दीक्षान्त समारंभ ऑनलाईन होणार आहे. मंगळवारी (ता. ६) सकाळी १०.४५ ते दुपारी १२ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने समारंभ होईल. यासाठी मोजक्याच स्नातकांना विद्यापीठातील शाहू सभागृहात बोलावले जाईल. येथे प्रथेप्रमाणे प्रमाणपत्र वाचन व अन्य कार्यक्रम होतील. दीक्षान्त समारंभाचे अध्यक्ष कुलपती भगतसिंग कोश्यारी समारंभात ऑनलाईन सहभागी होतील. यंदा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत प्रमुख पाहुणे आहेत. ते देखील ऑनलाईनच मार्गदर्शन करतील. त्यानंतर प्रत्येक विद्याशाखेतील सुवर्णपदक विजेत्या स्नातकाला प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्र आणि पदक देण्यात येईल. बाकी सर्व पदवी प्रमाणपत्र पोस्टाने पाठवले जातील. वाढत्या कोविड साथीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे."



**डॉ. अनिल सहस्रबुद्धे**



ते म्हणाले, "यंदाचे राष्ट्रपती सुवर्ण पदक भौतिकशास्त्रात विद्यापीठातून एम. एस. सी. केलेल्या सौरभ संजय पाटील यांना देण्यात येणार आहे. साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज महाविद्यालयातील महेश्वरी धनंजय

**पान ११ वर »**



**राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर झाल्याचे कळाले आणि आनंद झाला. अभ्यासाबरोबर सामाजिक कामही करीत होतो. त्याचे चीज झाले. माझ्या या यशात कुटुंबीय आणि शिक्षकांचे मोठे योगदान आहे. आता भौतिकशास्त्रात पीएच.डी. करणार आहे. याच विषयात पुढे संशोधन करण्याची इच्छा आहे.**

- **सौरभ पाटील**, राष्ट्रपती सुवर्ण पदक विजेता



**संस्कृतमध्ये एम.ए. केले. हा अभ्यासक्रम सुरू असतानाच नेट आणि सेट परीक्षा उत्तीर्ण झाले. सध्या पोस्टात ब्रँच पोस्टमास्तर म्हणून काम करते. कुलपती सुवर्णपदक मिळाले, याचे समाधान आहे. संस्कृत भाषा शिकण्याचाही आनंद आहे. माझ्या यशात कुटुंबीय, शिक्षक, मैत्रिणींचा वाटा आहे.**

- **महेश्वरी गोळे**, कुलपती सुवर्ण पदक विजेती

# कौलगेच्या सौरभ पाटीलला राष्ट्रपती सुवर्ण पदक

» पान १ वरून

गोळे यांना कुलपती सुवर्णपदक दिले जाणार आहे. यूट्यूबवर हा समारंभ सर्वांना पाहता येणार आहे.'' यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी परीक्षा नियंत्रक गजानन पळसे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर उपस्थित होते.

## पदवीधरांची संख्या दृष्टिक्षेपात

**पीएच. डी.**

| | |
|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | ९६ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | १० |
| मानव्यशास्त्र | ६२ |
| इंटर डिसिप्लिनरी स्टडी | ६ |
| एकूण | १७४ |

**एम. फिल.**

| | |
|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | ५ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ९ |
| मानव्यशास्त्र | २२ |
| इंटर डिसिप्लिनरी स्टडी | ० |
| एकूण | ३६ |

**पदव्युत्तर पदविका** (पोस्ट ग्रॅज्युएशन)

| | |
|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | ४०३८ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ३१९८ |
| मानव्यशास्त्र | २८९८ |
| इंटर डिसिप्लिनरी स्टडी | २०८ |
| एकूण | १०३४२ |

**पदवी**

| | |
|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | ३१२९२ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | १८६२७ |
| मानव्यशास्त्र | १४६४२ |
| इंटर डिसिप्लिनरी स्टडी | १८१२ |
| एकूण | ६६३७३ |

# शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ मंगळवारी ऑनलाईन

## ७७ हजार ५४२ विद्यार्थी- विद्यार्थिनींनी केली पदवी प्रमाणपत्रासाठी नोंद

**कोल्हापूर, ता. ३ (प्रतिनिधी )**

शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ मंगळवार दिनांक ६ एप्रिल २०२१ रोजी सकाळी ११.४५ वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात ऑनलाईन पद्धतीने संपन्न होणार आहे.

या समारंभाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्राचे मा. राज्यपाल आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी हे ऑनलाईन उपस्थितीद्वारे भूषविणार आहेत, तर प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत हे अतिथी म्हणून ऑनलाईन उपस्थित राहणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के हे विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे वाचन करतील तसेच शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रमोद पाटील हेही उपस्थित राहणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या दीक्षांत समारंभासाठी एकूण ७७ हजार ५४२ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पदवी प्रमाणपत्रासाठी नोंद केली आहे, यामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेण्यासाठी नोंद केलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी १ हजार ९८४, महाविद्यालयामार्फत पदवी घेण्यासाठी नोंद केलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी ४५ हजार ३०७ आणि अनुपस्थित राहून पदवी घेण्यासाठी नोंद केलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी ३० हजार २५१ असून सर्व पदवी प्रमाणपत्रे पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार आहेत.

५७ व्या दीक्षांत समारंभानिमित्त पदवी प्रमाणपत्रे व पारितोषिकांमध्ये मा.राष्ट्रपती सुवर्णपदक व माननीय कुलपती सुवर्णपदक या दोन पारितोषिकांचा समावेश असून ४ पारितोषिके विद्याशाखा निहाय पीएचडी प्राप्त स्नातकांना आहेत. माननीय राष्ट्रपती सुवर्णपदक सन २०१९ - २० या शैक्षणिक वर्षामध्ये क्रीडा, बौधिक व कलाक्षेत्र, एनसीसी, एनएसएस यामध्ये गुणवत्ता तसेच व्यक्तीमत्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसाधारण वर्तणूक व नेतृत्वगुण यासाठीचे विद्यापीठाचे सर्वसाधारण कौशल्यासाठीचे भारताचे महामहीम मा. राष्ट्रपती सुवर्ण पदक अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना प्रदान करण्यात येणार आहे तर मा. कुलपती सुवर्णपदक एमए अभ्यासक्रमातील संस्कृत या विषयांमध्ये सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल मा. कुलपतींचे सुवर्णपदक श्रीमती गोळे महेश्री धनंजय, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा या विद्यार्थीनीस प्रदान करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या आजपर्यंतच्या झालेल्या दीक्षांत समारंभ पैकी यावर्षीचा ५७ व्या दीक्षांत समारंभामध्ये सर्वात जास्त ७७ हजार ५४२ पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

सर्व पदवी प्रमाणपत्र पारितोषिके स्नातकांना पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार आहेत. या वर्षीच्या दीक्षांत समारंभामध्ये पीएचडी पदवी धारक १७४, एमफील ३६, मास्टर पदवीधारक १० हजार ३४२, बॅचलर्स पदवीधारक ६६ हजार ३७३, डिप्लोमाधारक ५५३ आणि सर्टिफिकेटधारक ६४ जणांचा समावेश आहे. ही माहिती परिक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी ऑनलाईन स्वरूपातील पत्रकार परिषदेद्वारे दिली.

# विद्यापीठात अभ्यागतांना महिनाभर नो एंट्री

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : अभ्यागतांना या महिनाअखेरपर्यंत विद्यापीठात कोणत्याही कामासाठी कार्यालयात भेटता येणार नाही. अगदीच गरजेचे असेल तर संबंधित विभागप्रमुखांनी विशेष पासची सोय उपलब्ध करून द्यावी, अशा सूचनांचे परिपत्रक शनिवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी जारी केले आहे.

कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या कडक निर्बंधांच्या आदेशाचे पालन शिवाजी विद्यापीठाने सुरू केले आहे. कार्यालयातील गर्दी कमी करण्यासाठी रोटेशन व वर्क फ्रॉम होम यांचा अवलंब काटेकोरपणे करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग पूर्ण क्षमतेने सुरू राहणार आहेत. अन्य कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी यांच्या उपस्थितीबाबत संबंधित कार्यालय प्रमुख उपस्थितीबाबतचा अहवाल आस्थापना विभागास सादर करावा असेही कुलगुरूंनी परिपत्रकात नमूद केले आहे.

दिव्यांग शिक्षक, अधिकारी कर्मचारी, सेवक यांना घरातूनच काम करण्याची सूट दिली आहे. त्यांनी तातडीच्या कामाची गैरसोय होऊ नये म्हणून मोबाईल, ई-मेल यांची माहिती कार्यालयात देऊन त्याप्रमाणे कामांचा निपटारा घरातूनच करायचा आहे.



# 'सोलर एनर्जी'मध्ये संशोधन करणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ पदार्थ विज्ञान विभागातील द्वितीय वर्षात शिकणाऱ्या सौरभ पाटीलने यंदाचे दीक्षान्त समारंभातील राष्ट्रपती सुवर्ण पदक पटकाविले आहे. पदार्थविज्ञान शास्त्रात पीएच.डी. करून सोलर एनर्जी विषयावर संशोधन करणार असल्याची भावना त्याने व्यक्त केली.

## राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी सौरभ पाटीलची भावना

सौरभ हा मूळचा कौलगे (ता. कागल) येथील आहे. गेल्या सात वर्षांपासून तो कोल्हापुरात वास्तव्यास आहे. वडील प्राध्यापक व आई गृहिणी आहे. त्याने पदवीपर्यंतचे शिक्षण त्याने विवेकानंद महाविद्यालयात पूर्ण केले. विद्यार्थिदशेत असतानाच आतापर्यंत त्याने ५० हून अधिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग नोंदविला आहे. कोरोनासंदर्भात ८ संशोधन पेपर जर्नल्समधून प्रकाशित केले आहेत.

चार लाखांची इन्स्पायर्ड शिष्यवृत्ती मिळाली आहे. माजी खा. धनंजय महाडिक यांच्या संसददर्शन कार्यक्रमांतर्गत दहा हजारांमधील अंतिम २६ मध्ये त्याची निवड झाली. त्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत संवाद साधला आहे. राष्ट्रपती सुवर्णपदक मिळविता आल्याचा खूप आनंद आहे. भविष्यकाळात पदार्थविज्ञान शास्त्रात पीएच.डी. करून एनर्जी विषयावर संशोधन करण्याचा मानस सौरभ याने व्यक्त केला.

# स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

यंदाच्या दीक्षांत समारंभ कुलपतींच्या सुवर्णपदकाची मानकरी साताराच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी महेश्वरी गोळे ठरली आहे. भविष्यात पोस्ट कार्यालय परीक्षा व स्पर्धा परीक्षा देऊन मोठे पद मिळविणार असल्याचा मानस तिने व्यक्त केला.

## कुलपती सुवर्णपदकाची मानकरी महेश्वरी गोळेचा मानस

सातारा शहरात मध्यमवर्गीय कुटुंबात महेश्वरी राहते. वडील अभियंता असून आई गृहिणी आहे. पदवी, पदव्युतरचे साताऱ्यातच पूर्ण केले. पदवी शिक्षण ८५ टक्के गुणांसह संस्कृतमधून पूर्ण केले. महाविद्यालयात अभ्यासात सातत्य ठेवले. त्याबरोबरच स्पर्धा परीक्षेचाही अभ्यास सुरू होता. एक मैत्रीण प्राध्यापक म्हणून रुजू झाली. तिच्याकडून मार्गदर्शन मिळाले. अभ्यास, परीक्षा नियोजन कसे करायचे तिने मोलाचे मार्गदर्शन केले. अभ्यासाच्या जोरावर कुलपतींचे सुवर्ण पदक मिळाले आहे, याचा निश्चित आनंद आहे.

Estd-1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## ५७ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये व विद्यार्थ्यांसाठी अधिसूचना

- शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात मंगळवार दि.६ एप्रिल, २०२१ रोजी सकाळी १०.४५ पासून ऑनलाईन पध्दतीने संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून श्री. भगत सिंह कोश्यारी, मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व मा. कुलपती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व सन्माननीय अतिथी, मा.नामदार श्री. उदय सामंत मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र हे ऑनलाईन उपस्थित राहणार आहेत.
- विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयान्वये परिनियमानुसार महाविद्यालयीन स्तरावर होणारे पदवी वितरण कार्यक्रम कोवीड १९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे होणार नाहीत व सर्व पदवी प्रमाणपत्रे अर्जावरील नमूद पत्यावर पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील.
- सदर समारंभ ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने व **सर्व पदवी प्रमाणपत्रे पोस्टाद्वारे** पाठविण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी विद्यापीठात उपस्थित राहू नये.
- ५७ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/57convocation) या सदरात प्रसिध्द करण्यात आली आहे.
- ५७ वा दीक्षांत समारंभाचे थेट प्रसारण दि.६/४/२०२१ रोजी सकाळी १०:४५ ते दुपारी १२:०० पर्यंत You tube Link : https://www.youtube.com/c/ShivVarta/ द्वारे पाहता येईल.

गजानन पळसे
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग
दि.: ०४/०४/२०२१

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd-1962
NACC 'A++' Grade

## • ५७ वा वार्षिक दीक्षान्त समारंभ •

**सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये व विद्यार्थ्यांसाठी अधिसूचना**

- शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षान्त समारंभ विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात मंगळवार, दि. ६ एप्रिल, २०२१ रोजी सकाळी १०.४५ पासून ऑनलाईन पद्धतीने संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून श्री. भगत सिंह कोश्यारी, मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व मा. कुलपती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व सन्माननीय अतिथी, मा. नामदार श्री. उदय सामंत, मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र हे ऑनलाईन उपस्थित राहणार आहेत.
- विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयान्वये परिनियमानुसार महाविद्यालयीन स्तरावर होणारे पदवी वितरण कार्यक्रम कोविड १९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे होणार नाहीत व सर्व पदवी प्रमाणपत्रे अर्जावरील नमूद पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील.
- सदर समारंभ ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने व **सर्व पदवी प्रमाणपत्रे पोस्टाद्वारे** पाठविण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी विद्यापीठात उपस्थित राहू नये.
- ५७ व्या दीक्षान्त समारंभासाठीच्या पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/57convocation) या सदरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- ५७ व्या दीक्षान्त समारंभाचे थेट प्रसारण दि. ६/४/२०२१ रोजी सकाळी १०.४५ ते दुपारी १२.०० पर्यंत You tube Link : https://www.youtube.com/c/ShivVarta/ द्वारे पाहता येईल.

सही/-

दीक्षान्त विभाग
दि. : ०४/०४/२०२१

**गजानन पळसे**
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd-1962
NAAC 'A++' Grade

## ५७ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये व विद्यार्थ्यांसाठी अधिसूचना

- शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात मंगळवार दि.६ एप्रिल, २०२१ रोजी सकाळी १०.४५ पासून ऑनलाईन पध्दतीने संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून श्री. भगत सिंह कोश्यारी, मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व मा. कुलपती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व सन्माननीय अतिथी, मा.नामदार श्री. उदय सामंत मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र हे ऑनलाईन उपस्थित राहणार आहेत.
- विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयान्वये परिनियमानुसार महाविद्यालयीन स्तरावर होणारे पदवी वितरण कार्यक्रम कोवीड १९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे होणार नाहीत व सर्व पदवी प्रमाणपत्रे अर्जावरील नमूद पत्यावर पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील.
- सदर समारंभ ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने व **सर्व पदवी प्रमाणपत्रे पोस्टाद्वारे** पाठविण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी विद्यापीठात उपस्थित राहू नये.
- ५७ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/57convocation) या सदरात प्रसिध्द करण्यात आली आहे.
- ५७ वा दीक्षांत समारंभाचे थेट प्रसारण दि.६/४/२०२१ रोजी सकाळी १०:४५ ते दुपारी १२:०० पर्यत You tube Link : https://www.youtube.com/c/ShivVarta/ द्वारे पाहता येईल.

गजानन पळसे
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दीक्षांत विभाग
दि.: ०४/०४/२०२१